दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
vadalvartanews@gmail.com
● बीड/महाराष्ट्र ● शुक्रवार १४ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३०६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# लोकसभेत भाजपला पाठिंबा देताना विधानसभेचं पुढचं पुढे बघू म्हणणाऱ्या राज ठाकरेंची स्वबळाची तयारी

## मनसे २०० ते २५० विधानसभांवर लढण्याची चाचपणी करतंय.

### वरळीत संदीप देशपांडे निवडणुकीच्या मैदानात?

दरम्यान, झळकलेल्या बॅनर्समुळे वरळी विधानसभेत मनसेकडून संदीप देशपांडे लढणार असल्याची चर्चा आहे. तसं झालं तर देशपांडेंविरोधात आदित्य ठाकरेंमध्ये सामना रंगू शकतो. 2019 ला आदित्य ठाकरेंनी वरळीतून राष्ट्रवादीच्या सुरेश मानेंविरोधात निवडणूक लढवली होती. ७० हजारांहून जास्तीच्या फरकानं आदित्य ठाकरे जिंकले होते. तर 2019 ला मनसेचे संदीप देशपांडे माहिममधून अखंड शिवसेनेच्या सदा सरवणकरांविरोधात लढले. देशपांडेंचा 18 हजार 647 मतांनी पराभव झाला होता.



लोकसभेलाच पाठिंबा देतेवेळीच मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी जागावाटपावरुन टीका केली होती. मात्र लोकसभेनंतर विधानसभेत दगाफटका झाल्यास स्वबळावर लढण्याचा इशारा मनसे नेते देत होते. 2009 ला राज ठाकरेंनी विधानसभेत 143 उमेदवार उभे केले, पहिल्याच दमात 13 आमदार जिंकले. त्यांनी 5.71 टक्के मतं मिळवली होती. त्यांच्या पक्षाने 2014 ला 219 उमेदवार उभे केले. पण एकच आमदार जिंकला. त्यावेळी त्यांनी 3.15 टक्के मतं घेतली. 2019 ला 101 उमेदवार उतरवले. त्यावेळीही एकच आमदार निवडून आला. मतदानाची टक्केवारी घटून 2.25 टक्क्यांवर आली. यंदा 2024 ला मनसे 200 ते 250 जागांवर स्वबळावर तयारी करत असल्याची माहिती आहे.

### मनसेला लोकसभेत किती यश आलं?

लोकसभा निवडणूक बघितल्यास मनसेनं 2009 ला 11 लोकसभांवर उमेदवार उभे केले. या निवडणुकीत त्यांनी 4.1 टक्के मतं घेतली. 2014 ला 10 उमेदवार उभे केले. ती टक्केवारी घसरुन दीड पर्यंत आली. 2019 ला मनसे लोकसभा लढली नाही. पण राज ठाकरेंनी भाजपविरोधात काँग्रेस-राष्ट्रवादी किंवा इतरांना मतदानाचं आवाहन केलं. 2024 ला देखील मनसे लोकसभेत उतरली नाही. यावेळी राज ठाकरेंनी काँग्रेस-राष्ट्रवादी विरोधात भाजपला मतदानाचं आवाहन केलं.

## पत्रकार अरविंद ओव्हाळ व दत्ता येवले यांचा वाढदिवस उत्साहात साजरा



जेष्ठ पत्रकार अरविंद ओव्हाळ व दत्ता येवले यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला प्रसंगी पत्रकार विष्णु उगले , परमेश्वर सोळंके , बाळा साहेब आडागळे , अमर साळवे , दर्शन डोंगरे वेदांत गोपाळ सह कपिल वाघमारे , रूपचंद कांबळे , अशोक जाधव , अनिल शेजूळ उपस्थित होते

## सन २०२४-२५ व २०२५-२६ करिता फळ पीक विमा योजनेत संबंधित शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे - कृषिमंत्री धनंजय मुंडे

### मृग व आंबिया बहारातील फळांचा विमा भरण्यास सुरुवात, विहित मुदतीत शेतकरी बांधवांनी विमा भरून घेण्याचे आवाहन

**प्रतिनिधी/मुंबई :-**

मुंबई (दि. 12) - प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना सन 2024-25 व 2025-26 या दोन वर्षात राबवण्यासंदर्भात राज्य शासनाने मान्यता दिली असुन मृग बहार व आंबिया बहारातील ठराविक फळ पिकांचा विमा शेतकऱ्यांनी भरून या योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.



या हंगामात राज्यात डाळिंब, संत्रा, मोसंबी, चिकू, पेरू, लिंबू, सीताफळ, द्राक्ष, आंबा, पपई, काजू, स्ट्रॉबेरी व द्राक्ष क इत्यादी पिकांचा फळपीक विमा योजनेत सहभाग करण्यात आला आहे. ही योजना भारतीय कृषी विमा कंपनी, बजाज अलियांज, फ्युचर जनरल आणि युनिव्हर्सल सोम्पो या चार कंपन्यांच्या मार्फत राबविण्यात येणार आहे. मृग बहरात द्राक्ष क, संत्रा, पेरू, लिंबू या चार पिकांसाठी विमा भरण्याची अंतिम मुदत 25 जून निश्चित करण्यात आली आहे; त्याचबरोबर मोसंबी चिकू 30 जून, डाळिंब 14 जुलै तर सीताफळ पिकासाठी 31 जुलै ही मुदत देण्यात आली आहे. दरम्यान 2024 ते 26 या दोन वर्षात राबविण्यात येणाऱ्या फळपिकविमा योजनेचे स्वरूप, विमा संरक्षित रक्कम यांसह सविस्तर माहिती कृषी विभागाकडून जारी करण्यात आली असून, फळ उत्पादक शेतकऱ्यांनी विहित मुदतीत आपला विमा भरून घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे.

## बीड पोलीस प्रशासनाच्या वतीने सद्भावना रॅलीचे आयोजन

**बीड/प्रतिनिधी**

बीड पोलीस प्रशासनाच्या वतीने जातीय सलोखा निर्माण करण्यासाठी बीड शहरात पायी सद्भावना रॅलीचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली १३ जून २०२४ सकाळी ११ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून ते डॉ बाबासाहेब आंबेडकर




यांच्या पुतळ्यापर्यंत भव्य रॅली काढण्यात आली यावेळी फेडरेशन महाएनजिओ महाराष्ट्र राज्य चे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे,सामाजिक कार्यकर्ते एड. संगीता धसे , जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.संजयजी तांदळे, अशोक येडे, लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, ओमप्रकाश गिरी आदी विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांसह पोलीस कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.


## कृषिमंत्री धनंजय मुंडे यांचा बीड जिल्हा दौरा कार्यक्रम

बीड दि. 13 :- राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्हाचे पालकमंत्री धनंजय मुंडे उद्या शुक्रवार दिनांक 14 जून रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत त्यांचा जिल्ह्यातील दौऱ्याचा कार्यक्रम खालील प्रमाणे. दुपारी 2.00 वाजता परळी वै. येथून बीड कडे मोटारीने प्रयाण दुपारी 3.45 वाजता शासकीय विश्रामगृह, बीड येथे आगमन व राखीव. दुपारी 4.00 वाजता जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे बैठकीस उपस्थिती व त्यानंतर सोयीनुसार बीड येथून परळी वै. कडे मोटारीने प्रयाण.

## पीएम किसान सन्मान योजनेचा १७ वा हप्त्याचे पैसे लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात

**परळी/प्रतिनिधी**

निवडणुकीची धामधूम संपली असून आचारसंहिता शिथील झाली आहे. पावसाळा सुरू झाल्याने शेतकरी पेरणीच्या तयारीला लागले आहेत. बियाणे तसेच खते खरेदी करण्यासाठी बळीराजाना पैशांची भासत आहे. हीच बाब लक्षात घेता केंद्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जमा केले जाणार आहेत.या पैशांमुळे शेतकऱ्यांना पेरणीसाठी मदत होणार आहे. पीएम किसान सन्मान योजनेचा १७ वा हप्त्याचे पैसे लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतील, पीपम किसान योजना ही केंद्रातील मोदी सरकारने सुरू



केलेली आहे. या योजनेअंतर्गत गरीब शेतकऱ्याऱ्यांना दरवर्षी तीन ८००० रुपयांची मदत केली जाते. प्रत्येकी २००० अशा तीन टप्प्यात पौपम किसानचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होतात. योजनेचा मागील म्हणजेच १६ वा हप्ता २८ फेब्रुवारी २०२४ रोजी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आला होता. त्यानंतर जवळपास ४ महिन्यांचा कालावधी लोटला, तरी १७ वा हप्याचा लाभ शेतक-यांना मिळाला नाही. त्यामुळे आता पुढील हप्याचे पैसे कधी मिळणार? याची सर्वजण आतुरतेने वाट पाहत आहेत. दरम्यान, तिस-यांदा पंतप्रधानपदी विराजमान झाल्यानंतर नरेंद्र मोदी यांनी पहिला निर्णय हा शेतक-यांच्या बाबतीत घेतला. पेरणीचा हंगाम तोंडावर असताना पंतप्रधानांनी १७ का हप्ता जारी करण्यासाठी फाईल पास केली. जाता या हप्याचे पैसे लवकरच खात्यावर जमा होण्याची शक्यता आहे. अधिकृत सूत्रांच्या माहितीनुसार, २५ जूनपर्यंत हे पैसे शेतक-यांच्या खात्यावर येतील. ज्यामुळे पेरणीला मोठी मदत होईल.

कविता

# पाऊस...

आला पहिला पाऊस
धुंद बरसल्या सरी
थेंब टपोरे टपोरे
कोसळले कितीतरी..१

तप्त काहिली जीवाची
आता वाटे गार गार
पावसाचा वाढो जोर
पडू दे मुसळधार..२

वाऱ्यासवे पसरला
चोहीकडे मृदगंध
थेंब रुजता मातीत
तोडी ती ही सारे बंध. ३

हौस भिजण्याची फार
सर्वांचीच सुरू घाई
मजा पहिल्या सरीची
वाटे ही आनंददायी..४

वेड लावतो पाऊस
करी उल्हासित मन
झोंबताच गार वारा
रोमहर्षी होई तन..५

सुचित्रा कुंचमवार??
नवी मुंबई


□□□□□□□□□□□□

# आज पासुन श्री क्षेत्र चाकरवाडी मध्ये अवतरणार पंढरी...
# संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवास उद्या पासुन सुरुवात..

## श्रीराम कथा प्रवक्ते श्री संत ज्ञानेश्वर माऊली दादा कृपांकित रामायणाचार्य श्री ह भ प समाधान महाराज शर्मा यांच्या सुश्राव्य वाणीतून गोड श्रीराम कथा.

**बीड प्रतिनिधी**

- विसाव्या शतकातील एक महान संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या चोविसाव्या पुण्यतिथी निमित्त भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात ज्येष्ठ शु. 8 , शुक्रवार दि. 14/06/2024 रोजी होणार आहे आणि सांगता जेष्ठ शु. 14 वटपोर्णिमा , शुक्रवार दि. 21/06/2024 रोजी होणार आहेत. बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रातील भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री क्षेत्र चाकरवाडी येथे प्रतिवर्षी सद्गुरू संत वै. ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ विविध कार्यक्रम पार पडतात. यंदाही ग्रामस्थ व संस्थानच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या अखंड हरिनाम सप्ताहास आज पासुन 14 -06-2024 पासुन सुरुवात होणार आहे आणि 21-06-2024 रोजी काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. यामध्ये पहाटे चार ते सहा काकडा भजन,6 ते 7 विष्णुसहस्रनाम , 7 ते 11 ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ ते दुपारी 1 गाथा भजन पार पडेल. दुपारी 2 ते 5 संगीतमय श्रीराम कथा , 5 ते 6 सायंकाळी हरिपाठ, 6 ते 8 अभंग वाणी संगीत भजनाचे आठ दिवस कार्यक्रम होणार आहेत. 8.30 ते 10.30 हरिकीर्तन व त्यानंतर रात्री हरीजागर व भारुड असे कार्यक्रमही होतील. दररोज दुपारी 2 ते 5 या वेळेमध्ये श्रीराम कथा प्रवक्ते श्री संत ज्ञानेश्वर माऊली दादा कृपांकित रामायणाचार्य श्री ह भ प समाधान महाराज शर्मा श्री शेत्र केज यांची श्रीराम कथा होणार आहे. तसेच श्री नादब्रह्म वारकरी शिक्षण संस्था श्रीक्षेत्र ताडबोरगाव जिल्हा परभणी यांचा दररोज हरिपाठ होणार आहे.





सप्ताहाची सुरुवात मंगल कलश स्थापना, दीपप्रज्वलन, ग्रंथ पूजन, टाळ, मृदंग, विना श्रुतीपूजन, ध्वजारोहण मठाधिपती महंत श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे श्री बंकट स्वामी मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनुर यांच्या शुभहस्ते पूजाविधी सोहळा संपन्न होऊन या महोत्सवास आरंभ होईल. व्यासपीठ भूषण मृदंग महामेरू श्री ह भ प रामबुवा महाराज काजळे श्री क्षेत्र ताडबोरगाव जि. परभणी यांची पारायण सेवेची सेवा दररोज सकाळी 7 ते 11 या वेळेमध्ये होणार आहे. सप्ताहाच्या प्रारंभी श्री बंकट स्वामी मठसंस्थानचे मठाधिपती लक्ष्मण महाराज मेंगडे यांचे कीर्तन होईल. त्यानंतर संत पिठाचार्य तथा अखिल भारतीय वारकरी मंडळ राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश महाराज बोधले, धर्मगुरू श्री ह भ प अमृताश्रम स्वामी महाराज जोशी श्री क्षेत्र नवगण राजुरी, प्रेम मूर्ती मठाधिपती महंत श्री ह भ प शिवाजी महाराज श्री क्षेत्र नारायण गड, व्याकरणाचार्य श्री ह भ प अर्जुन महाराज लाड गुरुजी श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था श्री क्षेत्र होळ, भागवताचार्य श्री ह भ प पद्माकर महाराज देशमुख अमरावती, ज्ञानसिंधू श्री ह भ प संदिपान महाराज शिंदे हासेगावकर अध्यक्ष श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था श्रीक्षेत्र आळंदी देवाची, तसेच काल्याचे किर्तन वारकरी संप्रदाय भूषण रामायणाचार्य श्री ह भ प रामरावजी महाराज ढोक नागपूरकर यांचे संपन्न होईल. त्यानंतर महाप्रसादिक महापंगती होतील. होणाऱ्या सर्व कार्यक्रमाचा आणि महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री. ह .भ.प महादेव महाराज तात्या श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांनी केले आहे. तरी भाविकांनी हरिनाम श्रवणाचा व महाप्रसादाचा अवश्य लाभ घ्यावा ही विनंती / आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी चाकरवाडी आणि तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री. ह.भ.प महादेव महाराज तात्या श्रीक्षेत्र चाकरवाडीकर यांनी केले आहे. सर्व कार्यक्रम सद्गुरु संत श्री माऊली महाराज समाधी मंदिर श्री क्षेत्र चाकरवाडी येथे पार पडणार आहेत. या सोहळ्यात महाराष्ट्रातील दिग्गज गायनाचार्य व मृदंगाचार्य यांची सेवा लाभणार आहे. या आध्यात्मिक ज्ञानसागराचा लाभ पंचक्रोशीतील आणि महाराष्ट्रातील भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

--------------------


### उत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली..

महाराष्ट्रातील धाकटी पंढरी श्री क्षेत्र चाकरवाडी येथील ग्रामस्थ व ह भ प तपोनिधी शांतीब्रह्म गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या श्री क्षेत्र चाकरवाडीकर यांच्या वतीने माऊली महाराज चाकरवाडीकर यांच्या 24 व्या पुण्यतिथी सोहळ्याची जय्यत तयारी केली आहे. या नामसोहळ्या स्वयंस्फूर्तीने सेवा समर्पित स्वयंसेवक तथा समस्त गावकरी मंडळी सुद्धा उपस्थित राहणार आहेत. भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये, यासाठी विशेष व्यवस्थाही केली आहे. उत्सव काळात जिल्ह्यातून लाखोंच्या संख्येने भाविक हजर राहतील, नेकनुर पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# मृगाचा पाऊस . . ! गंध मात्र मातीला ..!!

मृर्गाचा पाऊस सुरू झाला की हा पाऊस सर्वांना हवाहवासा वाटतो.त्याच्या थेंबाणे व्याकुळलेली पृथ्वी तर तृप्त होतेच.थेंबाच्या शिडकाव्याने मातीला एक सुंदर असा परिमळ सुटतो. आणि निसर्गात अनेक बदल जाणवतात.याच वातावरणात रानातील मोर आपला रंगीत पिसारा काढून मोदभरे नाचायला लागतात. हे मृगांच्या पावसाचे विशेष आहे.

पावसाळा सुरू झाला की,मृग नक्षत्राच्या पावसाला सुरुवात होते.या नक्षत्रात बियाण्यांची पेरणी केली जाते.आकाशात दिसणारी ढगांची दाटीवाटी पृथ्वीवर अंधार करून सोडते. उष्णतेच्या भडिमाराने तापलेली पृथ्वी शांत होते. पानाफुलात उत्साहिपणा आणि टवटवीत पणा जाणवतो. डोंगरात अन शेतात तृणाची पाती अलगद



डोके वर काढून जमिनीच्या कुशीतून वर येतात. निसर्गाला आणि शेतीला हिरवीगार झालर पांघरली जाते.कधी तरी हळूच ढगातून ऊन डोकावून पहाते.

झाडांच्या पानांवर पडणारे पावसाचे थेंब मोत्यासारखे वाटतात,शेजारी आसपास आणि शेतात बेडकांचे डरावने सुरू होते.त्यांच्या कर्णकर्कश आवाजाने कान बधिर होतात. आकाशात इंद्रधनू चे सप्तरंग अधून मधून पहायला मिळतात. शेतात पाण्याची डमके लक्ष वेधून घेतात.तर डोंगरातील झाडे झुडुपे खुलून दिसतात.

एकंदरीत मृगांच्या पावसात मन न्हाऊन निघते.आणि या दिवसात जे बदल होतात ते मात्र वेगळेच असतात.सर्वांच्या मनाला लाभतो तो मात्र गार आणि शितल गारवा. आणि मनसोक्त मातीचा दरवळ

येता पाऊस मृगाचा
सुटतो गंध मातीला
या मातीचा गंधच न्यारा
आवडतो मज साऱ्यांना!!

मोरांचा नाच .......!

पाऊस सुरू झाला की, अलगद आकाशात काळे ढग तयार होतात. आणि अल्हाददायक वातावरण मोरांच्या साठी तयार होते. मग मोर पाऊस येईल या आनंदात थुईथुई नाचायला लागतात. असेच चित्र आता शेतात रानावनात पाहायला मिळत आहे. पावसाच्या अधून मधून पडणाऱ्या या शिडकावामुळे निसर्गा बरोबरच प्राणी, पक्षी आनंदित झाल्याचे पाहायला मिळते.

# बीड श्रीवर्धनच्या एस.टी चालकाला प्रवाशांची ॲलर्जी

**शिरूर कासार/ प्रतिनिधी**

प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीदवाक्य घेवुन प्रवाशांना इच्छित स्थळी पोहचविणाऱ्या एस.टी चालकालाच प्रवाशांची ॲलर्जी असल्याचे दिसत आहे.12 जून बुधवार रोजी सायंकाळी साडेसहा वाजता पाथर्डी बस स्थानकात बीड श्रीवर्धन गाडी उभी असताना सदरील बस चालक गाडी मागे घेताना दोन प्रवाशांनी विनंती करुन देखील चालकाने गाडी उभी केली नाही.विशेष म्हणजे उभ्या असलेल्या प्रवाशांना नजरेच्या इशाऱ्याने बस बाजूला घेत असल्याचे सांगत गाडी थांबविली देखील नाही.या वरुन कर्तव्यावर असलेल्या बस चालकाला प्रवाशांची ॲलर्जी असल्याचे दिसत आहे. शिरूर कासार येथील दोन प्रवासी नगर येथून पाथर्डी आगाराच्या गाडीत पाथर्डी मध्ये आले होते.



या वेळी बीड श्रीवर्धन गाडीचा चालक फलाटावर लावलेली बस पाठीमागे घेत होता.त्याच क्षणी पाथर्डी आगाराच्या गाडीतून आलेले दोन प्रवासी शिरूर कासार येथे जाण्यासाठी बीड श्रीवर्धन गाडीच्या दिशेने आले.या वेळी एका प्रवाशाने चालकाला हात करत गाडी उभी करण्याची विनंती केली.त्या वेळी चालकाने नजरेच्या इशाऱ्याने बस बाजूला घेत असल्याचे दाखवून दिले परंतु गाडी थांबविली नाही.घडलेल्या या प्रकारावरुन बस चालकाचे प्रवाशांशी असलेले वर्तन तर दिसून आलेच पण त्याची मनमानी देखील समोर आली आहे.या प्रकरणी संबधित प्रवाशाने रितसर तक्रार केली आहे.

# धारूर येथे आज बालाघाट प्रतिष्ठाणचे वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन

**प्रतिनिधी** किल्ले धारूर जागतिक रक्तदान दिनी स्व.कॅप्टन राजपालसिंह हजारी यांच्या पुण्यस्मरणा निमीत्त बालाघाट प्रतिष्ठाणचे वतीने दि.१४ जुन रोजी रक्तदान शिबीर व गुणवंत विद्यार्थी सत्कार सभारंभाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे अवाहण बालाघाट प्रतिष्ठाणचे वतीने करण्यात आले आहे. धारूर येथील बालाघाट प्रतिष्ठाणचे वतीने गेल्या २६ वर्षा पासुन स्व. कॅप्टन राजपालसिंह हजारी यांचे पुण्यतिथि निमीत्त व जागतक रक्तदान दिना निमीत्त दि १४ जुन रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन केले जाते .सातत्याने हा उपक्रम सुरू आहे.या ही वर्षी नगरेश्वर मंदिर धारुर येथे रक्तदान शिबीर व गुणवंत विद्यार्थी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून जास्ती जास्त रक्तदात्यानी रक्तदान करावे असे आवाहन बालाघाट प्रतिष्ठाणचे वतीने करण्यात आले आहे.

# भविष्यात गोरगरिबांच्या हातातली काठी म्हणून काम करण्याचा संकल्प-अजित गालफाडे

## टायगर ग्रुप तालुकाध्यक्ष अजित गालफडे यांचा वाढदिवस केला विविध समाजिक उपक्रम राबवून साजरा

मी केंडेपिप्री धानोरा यासारख्या छोट्या गावातून आपल्या समाज कार्यास सुरुवात केली आहे गोरगरीब लोकांना माझ्यासारख्या छोट्याशा कार्यकर्त्यांच्या हातून काही तरी मदत मनून मी प्रतेक वेळी माझा वाढदिवस गोरगरीब, वंचित,विद्यार्थी, अनाथ लोक, व रुग्ण यांच्यासोबत साजरा करण्याचा संकल्प केला आहे आणि त्या मुळे या पुढे ही समाज उपयोगी व गोरगरीब जनतेसाठी कल्याणासाठी व उद्धारासाठीच मी काम करणार आहे..




वडवणी प्रतिनिधी - तालुक्यातील केंडेपिप्री धानोरा या छोट्याश्या गावात राहून आपल्या समाजकार्याला सुरुवात करणाऱ्या वडवणी तालुका टायगर ग्रुपचे तालुकाध्यक्ष अजित गालफाडे यांनी आपला वाढदिवस विविध सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबवून साजरा केला. टायगर ग्रुप राष्ट्रीय अध्यक्ष पै.डॉ. तानाजी भाऊ जाधव .मराठवाडा अध्यक्ष पै.गोरक्षक उमेश भाऊ पोखरकर व मा. नगरसेवक दत्तात्रय (आप्पा) जमाले पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. वडवणी तालुक्यात टायगर ग्रुप ला प्रत्येक गाव खेड्यात एक वेगळी ओळख निर्माण करून देण्यात अजित गालफाडे यांचा मोलाचा वाटा आहे. टायगर ग्रुप आणि अजित गालफाडे हे जणू समीकरणच वडवणी तालुक्यात आपणास पाहावयास मिळत आहे त्यांनी आजपर्यंत आपले वाढदिवस हे गोरगरिबांच्या कल्याणासाठी उद्धारासाठीच समर्पित केलेले आहे आज त्यांनी आपला वाढदिवस हा वेगवेगळी कार्यक्रम राबवून साजरा करण्याचा संकल्प करून आपल्या कार्यकत्याना तसा सूचना संदेश देण्यात आला यावेळी त्यांनी पसायदान सेवा प्रकल्प ढेक्कनमोहा या ठिकाणी अन्नदानाचा कार्यक्रम केला , वडवणी पोलीस स्टेशन येथे महापुरुषांची प्रतिमा भेट दिली, वडवणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र या ठिकाणी रुग्णांना फळे वाटप केले , तालुक्यातील गाव खेड्यातील तांडा वस्तीवर गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले , झाडे लावा झाडे जगवा हा उपक्रम राबविला यावेळी अजित गालफाडे मित्र मंडळ व टायगर ग्रुप सदस्य ,प्रदीप होके, वैभव राऊत ,अजिंक्य घोलप, नवनाथ खंडागळे ,अमोल चव्हाण ,राकेश उजगरे ,राजेश कसबे ,अभिजीत पोटभरे ,आकाश गालफाडे ,ईश्वर गालफाडे ,रंजीत गालफाडे ,भोला लोंढे, सुनील खंडागळे ,आदींसह टायगर ग्रुप सदस्य उपस्थित होते.

# मंगळवार 18 जून रोजी महिला लोकशाही दिन

बीड, दि. 13 :- जिल्हा स्तरावर महिलांसाठी लोकशाही दिन महिन्याच्या तिस-या सोमवारी आयोजित करण्यात येतो या लोकशाही दिनामध्ये शासन आदेशान्वये महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी, व्यासपीठ मिळण्यासाठी, त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. तालुकास्तरावर प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याचा चौथा सोमवार आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिस-या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. 18 जून 2024 रोजी सकाळी 11.00 ते 12.00 वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणा-या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतित महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय बीड येथे दाखल करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास विभागाने केले आहे.

# धारूर येथील जीवन ज्ञानदीप गुरुकुलमध्ये दहावीतील गुणवंतांचा सत्कार.

**धारूर/प्रतिनिधी**

धारूर येथील संकल्प सामाजिक संस्था द्वारा संचलित जीवन ज्ञानदीप गुरुकुल मधील विद्यार्थ्यांनी दहावी बोर्डाच्या परीक्षेत १००% निकालाची परंपरा याही वर्षी कायम राखली,ही गेल्या पंधरा वर्षापासुनची परंपरा कायम आहे.यामध्ये जयदत्त रमेश गडदे ९०.०० % ,रोहन दिनकर नागरगोजे ८७.४०%,,ऐतेशाम जमीर शेख ८७.००% ,दीपक कृष्णा तिडके ८३.००%,अभिषेक राजेभाऊ तोंडे८१.६०%,ऋषिकेश ज्ञानदेव तोंडे ८०.००%,श्रीरंग धुराप्पा हजारे ७९.००% ,संग्राम




अण्णासाहेब तोंडे ७६.८०% , ओमकार जालिंदर तोंडे ७६.२०% ,मिसबा फारूक शेख ७६.२०. ,रोहिदास बळीराम तोंडे ७४.६०.% ,ओमकार सुदाम तोंडे ७०.६०% यांनी प्रावीण्य यश मिळवल्याबद्दल त्यांचा व पालकांचा गुरुकुलमध्ये सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुकुलचे संचालक प्रा.रामकिसन चौरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून,जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक गणेश आकुस्कर ,मुख्याध्यापक अशोक मुंडे,धारूर येथील सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर शिंदे,डॉ.भारत मुंडे,नामदेव लांब, प्रा. कृष्ण मुरकुटे, राहुल तोंडे, रमेश गडदे, जमीर शेख, फारुक शेख उपस्थित होते.यावेळी पालक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ.कोमल चौरे यांनी केले तर सूत्रसंचलन गुरुकुलची विद्यार्थिनी कु. कल्याणी शेळकर हिने केले तसेच आभार गुरुकुलचा विद्यार्थी चि.भागवत मुंडे याने मानले.

# कंत्राटी कामगारांचे महावितरण कार्यालयासमोर धरणे आंदोलन वर्कस फेडरेशनच्या वतीने जोरदार जोरदार घोषणाबाजी

**माजलगाव प्रतिनिधी..**

बीड जिल्ह्यातील माजलगाव उपविभाग, धारूर उपविभाग व केज उपविभाग येथील महावितरण मध्ये काम करणारे बाह्यस्त्रोत यंत्रचालक व व तंत्रज्ञ या कामगारांचे गेल्या दोन महिन्यापासून पगार न झाल्यामुळे कामगारांनी काम बंद आंदोलनाचा पवित्रा घेतला. या आंदोलनात महाराष्ट्र स्टेट एलेक्ट्रीसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेने च्या वतीने बाह्यस्त्रोत कामगारांचे धरणे आंदोलन दि.१३.०६.२०२४ रोजी बीड येथील महावितरण कार्यालयासमोर धरणा आंदोलन व निदर्शने केली. या तिन्ही उपविभागात काम करणाऱ्या जवळपास ८५ कामगारांचा माहे एप्रिल व मे



चा पगार संबधित कंत्राटदारा मार्फत करण्यात आला नाही त्यामुळे बाह्यस्त्रोत कामगारांना असंख्य अडचणीणा सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे दि.१०.०६.२०२४ रोजी मा.अधीक्षक अभियंता यांना संघटनेमार्फत व वयक्तिक सर्व कामगारांचे पत्र देण्यात आले होते तरीही पगार न झाल्यामुळे आज संघटनेच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनामध्ये सर्व कामगार व महाराष्ट्र स्टेट एलेक्ट्रीसिटी वर्कर्स फेडरेशन संघटनेचे अंबाजोगाई विभागीय अध्यक्ष कॉम्रेड शेख अखिल यांच्यासह सर्व कामगार उपस्थित होते.

# कृषी विभागाशी संपर्कासाठी साठी टोल फ्री क्रमांक उपलब्ध

**प्रतिनिधी/बीड**

बीड, दि. 13 :- महाराष्ट्र राज्यात शेती क्षेत्राच्या दृष्टीने खरीप हंगामाचे महत्व अनन्यसाधारण आहे. राज्यातील शेतकरी खरीपहंगाम यशस्वी होण्यासाठी प्रयत्नशील असतात. अशावेळी बियाणे, खते व किटकनाशके या निविष्ठांचा पुरवठा वेळेतगुणवत्तापुर्ण व मुबलक प्रमाणात होणे अत्यावश्यक आहे. धनंजय मुंडे, मंत्री (कृषी), महाराष्ट्र राज्य,यांनी खरिप हंगाम 2024 च्या आढावा सभेमध्ये बियाणे, खते व किटकनाशकांच्या गुणवत्तापुर्ण उपलब्धतेबाबत राज्यातील शेतकरी, वितरक व विक्रेते यांना क्षेत्रीयस्तरावर येणा-या वेगवेगळ्या अडचणींचे निवारण करण्या करिता केलेल्या सुचनेनुसार आयुक्तालयस्तरावर नियंत्रण कक्ष स्थापित करण्यात आला आहे. या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्यासाठी संपर्काचा WhatsApp क्रमांक (केवळ संदेश पाठविण्याकरिता) 9822446655 उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच कृषि विभागाचा टोल फ्री क्रमांक (तोंडी तक्रार नोंदविण्याकरिता) 18002334000 क्रमांकावर सुद्धा संपर्क करता येईल.

या सोबतच अडचण किंवा तक्रार controlroom.qc.maharashtra@gmail.com या ई-मेल वर सुद्धा पाठवता / नोंदवता येईल.संबंधीतांनी, उपरोक्त नमुद WhatsApp क्रमांक (9822446655),टोल फ्री भ्रमणध्वणी क्रमांक (18002334000) तसेच ई-मेलवर (controlroom.qc.maharashtra@gmail.com) येणा-या अडचणी वनिविष्ठांची गुणवत्ता, किंमत. साठेबाजी व लिंकींग बाबत असलेल्या तक्रारी नोंदवताना, नाव, पत्ता, संपर्क क्रमांक वअडचणी किंवा तक्रारीचा संक्षिप्त तपशिल द्यावा. सदर माहिती को-या कागदावर लिहून त्याचा फोटो Whats app किंवा ई-मेलवर पाठवल्यास सुध्दा आपल्या तक्रारींचे निराकरण करणे सोईस्कर होईल. ज्या शेतक-यांना Whats app चा वापर करणे शक्य नसेल त्यांनी उपरोक्त क्रमांकावर संपर्क क्रमांकासह तोंडी तक्रारी नोंदवाव्यात..

शेतक-यांच्या सुविधेसाठी 1 भ्रमणध्वणी, 1 टोल फ्री क्रमांक व ई मेल तक्रार निवारणासाठी समर्पीत केलेले असुन त्यावर शेतक-यांना त्यांच्या तक्रारी 1 जुन ते 30 सप्टेंबर 2024 या कालावधीत सकाळी 8 ते रात्री 8 या वेळेतनोंदवण्या बाबत आवाहन करण्यात येत आहे.

# बोधेगाव परिसरात पाणी स्त्रोत वाढल्याने टँकरने पाणी पुरवठा बंद

बीड, दि. 13 :-बोधेगाव परिसरात गेल्या 10 दिवसापासून पाऊस झाल्यामुळे स्त्रोत वरुन पाणी टँकर जाण्याचा रस्ता हा पूणत खचला आहे. त्यामुळे सदरील स्त्रोतावरुन पाणी पुरवठा करणे शक्य नाही तसेच पाऊस पुरेसा झाल्यामुळे गावातील पाणी पुरवठा स्त्रोताला पाणी आले असल्याने सध्या टँकरची आवश्यकता नाही, असे ग्रामपंचायत सिरसाळा यांनी कळविले आहे. सदरील टँकर दि. 12 जून 2024 पासून बंद करण्यात आले असल्याचे परळी वैद्यनाथ पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# भाग बदलत पाऊस पडणार, हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी हवामानाचा आणि पावसाचा अंदाज वर्तवला .

मान्सून महाराष्ट्रात दाखल झाला आहे. काही ठिकाणी दमदार पाऊस होतोय. तर काही ठिकाणी रिमझिम पावसाच्या सरी कोसळत आहेत. अशात बळीराजा खरीप पिकांच्या पेरणीच्या तयारीला लागलाय. पेरणी कधी करावी? याचा अंदाज शेतकरी घेत आहेत. पण पेरणी नेमकी कधी करावी? याची शेतकरी चाचपणी करत आहेत. अशातच हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी पावसाबाबतचा अंदाज व्यक्त केला आहे. पाऊस कधी आणि किती प्रमाणात पडणार? यावर पंजाबराव डख यांनी अंदाज व्यक्त केलाय. शेतकऱ्यांनी पेरणी कधी करावी, यावरही पंजाबराव डख यांनी भाष्य केलं आहे. शेतकऱ्यांना सल्ला काय? 16 जून नंतर पुन्हा एकदा पाऊस सक्रिय होणार आहे. साधारणता 18 जून नंतर जोरदार पाऊस सुरु होईल. आता महाराष्ट्रात पावसाला सुरुवात





झाली आहे. मात्र शेतकऱ्यांनी थोडी प्रतिक्षा करूनच पेरणी करावी. जमीन किमान सहा इंच ओल गेल्यानंतरच पेरणी करण्याचा निर्णय घ्यावा, असा सल्ला पंजाबराव डख यांनी शेतकऱ्यांना दिला. शेतकरी काही वेळी पेरणी लवकर करतात. त्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचं संकट येतं. यावरही डख बोलले आहेत. पेरणीचा निर्णय घाई घाईने घेऊ नये. अन्यथा शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागू शकते. मनसोक्त तसंच पेरणीयोग्य पाऊस झाल्यावर पेरणीचा निर्णय घेतला पाहिजे. जेणेकरून शेतकऱ्यांना नुकसानीचा सामना करावा लागणार नाही, असा सल्लाही पंजाबराव डख यांनी शेतकऱ्यांना दिलाय.

### पंजाबराव डख यांचा अंदाज काय?

राज्यात 14 जूनपर्यंत दररोज भाग बदलत पाऊस पडणार आहे. परंतु या कालावधीत राज्यातील दक्षिणेकडील भागांमध्ये चांगला पाऊस पडणार अशी शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, अहमदनगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, धाराशिव, पंढरपूर या भागात मुसळधार पावसाची शक्यता आहे. उर्वरित महाराष्ट्रात मात्र खूप मोठ्या प्रमाणात पाऊस पडणार नाही. तसेच 15 ते 16 जून दरम्यान पावसाची विश्रांती पाहायला मिळू शकते, असा अंदाज पंजाबराव डख यांनी व्यक्त केला आहे.

# कृषी कन्यांनी शेतकऱ्यांना दिली बिजांकुरण प्रात्याक्षिकाची माहिती

**नवगण राजुरी प्रतिनिधी**

सौ.के.एस.के.(काकू) कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी बिजांकडून या विषयावर प्रात्याक्षीकाद्वारे शेतकऱ्यांना माहिती दिली. योग्य नियोजना अभावी दरवर्षी शेतकऱ्यांना बियाणे न उगवल्यामुळे दुबार पेरणीची वेळ येते त्यामुळे या प्रात्यक्षिकामुळे बियाण्याची उगवण्याची क्षमता पेरणीपूर्वीच चाचणी करून घेणे गरजेचे आहे. विद्यार्थिनींनी शेतकऱ्यांना बिजांकुरण प्रदर्शनाबद्दल सविस्तर माहिती दिली. सोयाबीन या पिकाचे प्रात्यक्षिक करून दाखविले. यावेळी कृषी कन्या खोड प्रतीक्षा, गवळी संध्या, पवार ज्योती, करांडे रूपाली, पाटील यशस्वी, खोले निकिता उपस्थित



होत्या. ग्रामीण जागरूकता कार्यक्रम कार्यानुभव कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी अनंत कृषी विकास प्रतिष्ठानचे सहसचिव डॉ.जी.व्ही. साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभत आहे तसेच प्राचार्य एस.पी. मोरे, प्रा.व्ही.जी. तायडे, एस.एस. राठोड, पी.ए. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

### एम.एस. पी. मंडळाच्या सदस्य पदी ॲड.रणजित सोनवणे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार



मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्निक बीडच्या सदस्यपदी ॲड. रणजीत सोनवणे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना बीड जिल्हा वकील संघाचे माजी अध्यक्ष ॲड. आवटे बाप्पा, ॲड.सदानंद राऊत,ॲड. दिनेश हांगे, ॲड. अविनाश गडगे, ॲड. अरविंद काळे, ॲड.प्रशांत देशपांडे, ॲड. सचिन अबुज, ॲड. उद्धव रासकर, ॲड. नरेंद्र कुलकर्णी, ॲड. सय्यद साजेद, ॲड. रंजीत वाघमारे, ॲड. राहुल वाडमारे व वकील संघातील सदस्य यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या

# लोकसभा तो झांकी थी,विधानसभा अभी बाकी है- फुलचंद कराड

## ८० % खासदार निवडुन आणणारे शरदचंद्र पवार एकमेव नेते फुलचंद कराड आणी विजय हे समिकरण या लोकसभेतही कायम

फुलचंद कराड हे बीड जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय आहेत.ज्या पक्षात असतील त्यांचे इमानेईतबारे काम करत त्या उमेदवाराच्या विजयात मोठा वाटा उचलला आहे.2004 पासुन बीड लोकसभा मतदार संघात फुलचंद कराड आणी त्या पक्षाचा उमेदवार विजयी हे समिकरण या निवडणुकीत बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या विजयाने कायम राहिल्याने आगामी विधानसभा निवडणुकीत फुलचंद कराड यांच्या नेतृत्वगुणाची छाप दिसणार आहे.



**वादळवार्ता/परळी**

बीड लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या विजयानंतर प्रतिक्रिया देताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जेष्ठ नेते फुलचंद कराड यांनी लोकसभा तो झांकी थी,विधानसभा अभी बाकी है असे सांगत विजयाचे गणित मांडताना महाराष्ट्राच्या इतिहासात 80 % टक्के जागा निवडुन आणणारे शरदचंद्र पवार हे एकमेव नेते असल्याचे सांगितले. बंजरंग बप्पांच्या विजयामुळे फुलचंद कराड व त्या पक्षाच्या उमेदवाराचा लोकसभा बीड लोकसभा मतदार संघातील विजय हे गणित या निवडणुकीतही कायम राहिल्याचे दिसुन आले.

बीड लोकसभा मतदार मतदार संघातुन काँग्रेस,शिवसेना(उबाठा),राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बाप्पा सोनवणे यांच्या विजयानंतर प्रतिक्रिया देताना जेष्ठ नेते फुलचंद कराड म्हणाले की मी राजकारणात कधीच एका व्यक्तीला अथवा समाजाला विरोध केलेला नाही. राजकारण करत असताना संत भगवानबाबा यांच्या नावाने भगवानसेना ही संघटना काढुन बाबांचा फिरता नारळी सप्ताह घेतला. माझ्या सर्व संस्थांना भगवानबाबांचे नाव देत विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे काम करत आहे. मला माझा पुर्वीचा पक्ष सोडण्याची वेळ मुंडे बहिण-भावाने आणली.सध्या माझ्याबाबत वंजारी समाजात गैरसमज पसरवण्यात येत असले तरी गत लोकसभा निवडणुकीत प्रितम मुंडे यांच्या विरोधात भाऊ धनंजय मुंडे यांनी त्यावेळी बजरंग बप्पाचे काम केले मग आता मी काय देशद्रोह केला की काय?विकासाच्या मुद्यापासुन भरकटवण्यासाठी बहीण-भावाची ही खेळी असुन त्यांना गरज पडल्यावरच समाज आठवतो.मी माझे राजकारण स्वत:ची शेती विकुण करत असुन या निवडणुकीत परळी विधानसभा मतदार संघात आमची ताकद काय हे विरोधकांच्या लक्षात आले असेल.या निवडणुकीत अंबाजोगाई येथील सभेत पवार साहेबांसमोर आपल्या पक्षाला 100 % यश मिळेल असे सांगितले होते. या निवडणुकीत बप्पांचा विजय साडेसहा हजाराच्या मताधिक्याने झाला असला तरी हा विजय साठ हजार मतांचा आहे. आगामी काळात होणार्या जिल्हा परिषद,पंचायत समिती,नगरपालिका व विधानसभा निवडणुकीत आम्ही त्यांना पुन्हा धक्का देवु असे फुलचंद कराड यांनी यांनी सांगितले.



मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती अशोक आबा डक यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना संघर्ष लढा पत्रकार संघ माजलगाव



बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार मा. बजरंग बप्पा सोनवणे यांचा सत्कार करतांना पत्रकार परमेश्वर बप्पा सोळंके , बाळासाहेब आडागळे , अमर साळवे , विजय कापसे व सिध्देश्वर गायकवाड

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )